मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 22 जुलै 2024 | पान- 1

# कुणाचं कुणावाचून नडत नाही.. अजित पवारांनी सुनावले..!

## पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचा कार्यकर्ता मेळावा झाला : या मेळाव्यात अजित पवारांनी उपस्थितांना संबोधित केलं.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मोठे खिंडार पडल्यानंतर अजित पवार यांनी रविवारी (दि. 21) काळेवाडी येथे कार्यकर्ता मेळावा घेतला. या मेळाव्यात अजित पवारांनी उपस्थितांना संबोधित केलं. तेव्हा बोलताना अजित पवार यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. या मेळाव्यात त्यांनी पक्षातून गेलेल्या पदाधिकाऱ्यांना उद्देशून 'कुणाचं कुणावाचून नडत नाही' असा टोला लगावला. तसेच जे दिवसा इकडे आणि रात्री तिकडे असतात त्यांनी कुठेतरी एकाच ठिकाणी जा, असे म्हणत कुंपणावरच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना बजावले.

ज्या कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट नसेल तर त्यांना समजावून सांगा. कोण काही येऊन सांगत असेल तर यांना फार काही शहराबद्दल जिव्हाळा आहे असं नाही, अजित पवार म्हणजे पिंपरी चिंचवड आहे. कुणाचं कुणावाचून नडत नाही, दिवसा इकडे आणि रात्री तिकडे असं काही करू नका. आपल्याच पक्षाकडे राहा. काही जण दिवसा इकडे असतात रात्री तिकडे असतात, अशांनी तिकडे जायचे तर तिकडे जा, असं म्हणत अजित पवारांनी कुंपणावरच्या नेत्यांना टोला लगावला.



### डीपीडीसीच्या बैठकीबद्दल अजित पवार म्हणाले

» डीपीडीसी बैठकीमध्ये कोण किती वेळ बोलले आणि अजित पवार यांनी किती ऐकलं याचं रेकॉर्ड आहे. पण उगाच सहानुभूती घेण्यासाठी काहीजण म्हणतात की मी साहेबांना बोलू दिलं नाही. अरे मी कसा बोलू देणार नाही, असं म्हणत अजित पवार यांनी सुप्रिया सुळे यांना चिमटा काढला. मी भेदभाव करणारा नेता नाही, विरोधकांना पण माहिती आहे, काल काही गोष्टी घडल्या, अडीच तास मीटिंग झाली. सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे यांच्यासह अनेकजण होते. सुप्रिया सुळे म्हणाल्या, की मावळमध्ये जास्त निधी दिला. यावर शेळके यांनी म्हटलं की तुम्ही सारखा हा उल्लेख करतायत. कुणाला दुखवायचं नाही. मी साहेबांचा अपमान केला नाही, सुप्रिया यांनी म्हटलं मी अपमान केला. हा आरोप म्हणजे नेरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न आहे,

### योजना हव्या असतील तर...

» दूध, गॅस, लाडकी बहिण योजना यासह इतर सर्व योजना आहेत. यावर सरकार आता 75 हजार कोटी खर्च करत आहे. अजित दादाचा वादा आहे. दादा वाद्याचा पक्का आहे. पण हे सगळं हवं असेल. या योजना हव्या असतील तर परत महायुतीला निवडून द्या. काम कसं करून घ्यायचे मी बघतो, असेही अजित पवार म्हणाले.

### पुणेकरांनो! थोडी कळ काढा

» पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रोचे काम सुरु आहे. जिल्ह्यात रिंग रोड आणि अजून काही कामे करायची आहेत. या योजना करता करोडो रुपये लागतात. केंद्राशी काही योजनांबाबत चर्चा झाली आहे. काही कामे सुरु आहेत. वाहतूक कोंडीचा त्रास होत आहे. पण पुणेकरांनो थोडी कळ काढा, मी कसं करतो बघा, असा विश्वास त्यांनी दिला.

# महामार्गावरील सेवा रस्त्यावर डांबरीकरण ठरेल तात्पुरती मलमपट्टी!

## वाकडच्या सेवा रस्त्यावर केली जातेय खड्ड्यांची डागडुजी, भर पावसात केल्या जाणाऱ्या डागडुजीमुळे नागरिक संतप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

बेंगलोर महामार्गावरील सेवा रस्त्यावर वाकड, ताथवडे, पुनावळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले होते. पावसामुळे खड्डयांच्या आकारात वाढ होऊन ते एक ते दीड फुटाचे झाले होते. पावसामुळे रात्रीच्या वेळी वाहने खड्डयांत आदळून मोठ्या प्रमाणात अपघात होऊ लागले होते. वाहनचालकांना खड्डयांचा अंदाज येत नसल्याने वाहने आदळून अनेक वाहने बंद पडू लागली होती. याबाबत नागरिकांना त्रास होऊ लागल्याने महापालिकेने तत्काळ भर पावसात खड्डे बुजवून सेवा रस्त्यावर डांबरीकरण सुरू केले आहे.

पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गालगत पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील किवळे, रावेत, ताथवडे, पुनावळे, वाकड परिसरात सेवा रस्त्यावर जीवघेण्या खड्डयांमुळे अपघात होऊन प्रवाशांचे नाहक बळी जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. गेल्या कित्येक दिवसांपासून सेवा रस्त्यावर मोठे खड्डे पडले होते. मात्र, वाकडे महापालिकेसह लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केले होते. परिणामी दुचाकीसह चारचाकी वाहनचालकांनाही खड्डे चुकवत प्रवास करावा लागत होता. वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत परिसरात हिंजवडी आयटी पार्कमध्ये काम करणारे नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. आयटी पार्कमध्ये जाण्यासाठी वाकडमधून हिंजवडीकडे आणि भूमकर चौकातून हिंजवडीकडे दुचाकी, फोर व्हीलरमधून बहुतांश नागरिक ये-जा करत असतात. मात्र, गेल्या कित्येक दिवसांपासून महामार्गालगतच्या सेवा रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमुळे नागरिक हैराण झाले होते. सध्या पावसाळा सुरू असल्याने खड्डयांत पाणी साचून राहिल्यास नेमका खड्डा कुठे आहे, हे देखील वाहनचालकांना कळत नव्हते.

महामार्गालगत सेवा रस्त्यावरील खड्डे संबंधित विभागाने व्यवस्थित बुजवून टाकावेत, जेणेकरून पावसामुळे पुन्हा खड्डे पडणार नाहीत. याबाबत स्थापत्य विभागाकडून योग्य ती दखल घ्यावी, अशी मागणीदेखील नागरिक करत आहेत.



### डांबर वाहून जाण्याची भीती

» वाकड परिसरातील सेवा रस्त्यालगतचे सर्व मोठे खड्डे डांबरीकरणाने बुजवण्यास सुरुवात केली आहे. भर पावसात डांबरीकरण करत हे खड्डे बुजवले जात आहेत. मात्र, वरवरची मलमपट्टी करून खड्डे बुजवल्यास ते पुन्हा उखडणार आहेत. सध्या पावसाळा सुरू आहे. परिणामी, डांबरीकरण व्यवस्थित न झाल्यास पाऊस मोठ्या प्रमाणात होऊन पाणी साचल्यास खड्डयांची दुरुस्ती तात्पुरती ठरणार आहे. मुसळधार पावसाने खड्डयावर डांबर वाहून जाण्याची भीती आहे.

# शरद पवार हे भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे सूत्रधार : अमित शाह

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुणे दौऱ्यावर या दौऱ्यादरम्यान भाजपच्या अधिवेशनाला अमित शाह हजर होते

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचा पुण्यात आज कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भाजपकडून पुण्यात आज आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिवेशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची विशेष उपस्थिती राहिली. या कार्यक्रमात अमित शाह यांनी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना संबोधित केलं. यावेळी अमित शाह यांनी आपल्या भाषणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावर सडकून टीका केली. शरद पवार हे भारताच्या राजकारणातील भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे सरगना (सूत्रधार) आहेत, अशी खोचक टीका अमित शाह यांनी केली. अमित शाह यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरूनही शरद पवार यांच्यावर निशाणा साधला.

"विरोधकांनी म्हटलं, भाजप आरक्षण संपवत आहे. आम्ही उत्तर देताना काही ठिकाणी संकोच करत होतो. लोकांच्या मनात भ्रम निर्माण झाला. मी आज सांगायला आलो आहे की, 10 वर्षांचा एक्स्टेंशन नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये मिळालं आणि पूर्ण बहुमत असतानाही आरक्षणाला बळ देण्याचं काम आमचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. विरोधकांनी संविधानाचा विषय काढला. आम्ही उत्तर दिलं. आता निवडणूक महाराष्ट्रात आली आहे. आता नव्यानव्या प्रकारचे गैरसमज शरद पवार उभे करत आहेत", असा आरोप अमित शाह यांनी केला.

"पण यावेळी शरद पवारजी माझा कार्यकर्ता हुशार झाला आहे. त्याला तुमच्या खोट्या प्रचाराची जाणीव झाली आहे. आता तुमचा खोटा प्रचार चालणार नाही. घरोघरी जावून या खोट्या प्रचाराचा पर्दाफाश करायचा आहे. हे खोटं बोलणार आणि भ्रम निर्माण करतील. प्रत्येक कार्यकर्ता हा कमळसाठी समर्पित व्हावा. प्रत्येक कार्यकर्त्याने कमळला जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकष्ठा करावी", अशा सूचना अमित शाह यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिल्या.



### 'पवारांचं सरकार येईल तेव्हा मराठा आरक्षण गायब होईल'

» "मी आज शरद पवारांना सांगायला आलोय, आमचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सर्व उत्तर देत आहेत. पण माझं लांबून एक निरीक्षण आहे, ते मी आता तुमच्यासमोर सांगत आहे, महाराष्ट्रात जेव्हा-जेव्हा भाजपचं सरकार येतं, मराठा समाजाला आरक्षण मिळतं आणि जेव्हा-जेव्हा शरद पवार यांच्या आघाडीचं सरकार येतं तेव्हा मराठा आरक्षण गायब होतं. मी विचार करुन हे वाक्य बोलतं. महाराष्ट्रात 2014 मध्ये भाजपचं सरकार आलं. सुप्रीम कोर्टात मराठा आरक्षण टिकलं. मध्यंतरी शरद पवार यांचं सरकार आलं, मराठा आरक्षण गायब झालं. आम्ही पुन्हा आलो. आम्ही आतासुद्धा मराठा आरक्षण देण्याचं काम केलं आहे. शरद पवार यांचं सरकार येईल, तेव्हा मराठा आरक्षण पुन्हा गायब होईल. मराठा आरक्षण कायम ठेवायचं असेल तर कुणाचं सरकार आणलं पाहिजे? समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचं काम भाजपने केलं आहे", अशी टीका अमित शाह यांनी केली.

### औरंगजेब फॅन क्लबचे नेते

» उद्धव ठाकरे महाराष्ट्रातील औरंगजेब फॅनक्लबचे नेते आहेत, अशी खोचक टीका अमित शाह यांनी केली. "नरेंद्र मोदी यांनी तुष्टीकरणाच्या ऐवजी सर्वांना न्याय देण्याचं काम करत देशाच्या संरक्षणाला सुनिश्चित केलं आहे. आतंकवादला मुळासकट फेकून टाकण्यासाठी निर्णय घेतले आहेत. मी त्याचा साक्षीदार आहे. देशाच्या सुरक्षेला औरंगजेब फॅन क्लब सुनिश्चित करु शकत नाही. भाजप करु शकते. औरंगजेब फॅन क्लब कोण आहे? आघाडीवाले आणि त्याचे अध्यक्ष कोण आहेत, श्रीमान उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे नेता बनले", असा घणाघात अमित शाह यांनी केला.

### अमित शाह यांचा काँग्रेसवर आरोप

» "बंधू आणि बघिणींनो मी नेहमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव घेत आलो आहे. मी अभ्यासाच्या आधारावर सांगू शकतो की, बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान जितका काँग्रेसने केला आहे तितका इंग्रजांनी सुद्धा केला नव्हता", असा आरोप अमित शाह यांनी केला. "ही गोष्ट आपल्याला घरोघरी जावून करायचं आहे. बाबासाहेबांशी जोडलेले 5 तीर्थ बनवण्याचं काम भाजप पक्षाने केलं. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न पुरस्कार काँग्रेस पक्ष असताना मिळाला नाही. नरेंद्र मोदी सरकारने संविधान दिवस साजरा करायला सुरुवात केली. बाबासाहेबांच्या आठवणीत दिल्लीतही त्यांचं भव्य स्मारक बनवण्याचं काम सुरु आहे", अशी माहिती अमित शाह यांनी दिली.

---

# 20 आमदार कधी फुटले ते तुम्हाला कळलं नाही, महाविकास आघाडीला फडणवीस यांचा चिमटा

## मैदानात उतरा आणि ठोका...; फडणवीसांनी कार्यकर्त्यांना दिले आदेश, विधानसभा जिंकण्याचा दिला फॉर्म्युला

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक निकालाचा आधार घेत त्यांनी विरोधकांवर फेक नरेटीव्ह पसरवण्याचा आरोप केला. देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडीविरोधात तुफान बॅटिंग केली. लोकसभा निवडणुकीतील निकालाच्या आधारे त्यांनी विरोधकांवर आरोपांच्या फैरी झाडल्या. विरोधकांनी फेक नरेटीव्ह पसरविल्याचा आरोप त्यांनी केला. पण खोटं फार काळ टिकत नसल्याचे ते म्हणाले. त्यांनी विधानसभेसाठी कंबर कसल्याचे दिसून आले. त्यांनी कार्यकर्त्यांना विधानसभा निवडणूक जिंकण्याचा फॉर्म्युला पण सांगून टाकला. महाविकास आघाडीच्या आरोपांना न घाबरता थेट उत्तर देण्याचा आदेशच त्यांनी दिला.



### विरोधक तर लबाड

» विरोधकांना पुन्हा एकदा सत्तेत येऊन आपल्या सर्व योजना बंद करायच्या आहेत. आपण लाडकी बहीण योजना आणली. विरोधक किती लबाड आहेत बघा या योजनेला सभागृहात विरोध करतात आणि गावागावात पहिले जाऊन पोस्टर आपलं लावतात. माझे कार्यकर्त्यांना सांगणे आहे की ही योजना आपली आहे. आपल्या लोकांनी महिलांचे अर्ज भरून घ्यावे. विरोधकांची रणनीती आहे की महिलांचे अर्ज भरून घ्यायचे आणि सरकारला ते द्यायचे नाही. ही योजना काही फसेल यासाठी यांचे प्रयत्न सुरू आहे, असे ते म्हणाले

### खोट्याचा फुगा आम्ही फोडला

» मोदींनी आरक्षणाची सीमा वाढवली. पण एक खोटा नरेटीव्ह तयार केला की हे निवडून आले तर आरक्षण रद्द करणार, असे खोटे सांगण्यात आले. खोटं फार काळ टिकत नाही. खोट्याचा फुगा आम्ही फोडायला सुरुवात केली. विधान परिषदेत आम्ही टाचणी लावली आहे.हे म्हणत होते महायुतीचे आमदार फुटणार अरे तुमचे २० कधी फुटले हे तुम्हाला कळले नाही, असा चिमटा फडणवीसांनी काढला.

### काय दिला फॉर्म्युला

» आमच्या मुलींना उच्च शिक्षणात १०० टक्के फी माफ होणार आहे. नरेटीव्ह तयार होतो पण आपले लोक उत्तर देत नाही. आपले लोक उत्तर देत नाही आदेशाची वाट बघतात. मी आज आदेश देतो फुल बॅटिंग करा. आदेश विचारू नका मैदानात उतरा आणि ठोकून काढा. फक्त बोलताना आपली हिट विकेट पडू देऊ नका, असा फॉर्म्युलाच जणू त्यांनी दिला.

# 'डेंग्युमुक्त शहर' अभियानाला सुरुवात

## पिंपरी-चिंचवडमध्ये संशयित तीन हजार रुग्णांच्या रक्ताचे नमुने तपासणीस, डेंग्युग्रस्त 27 रुग्णांवर उपचार, कीटकजन्य आजाराची रुग्णसंख्येत वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात डेंग्यू आजाराचे अचून निदान व्हावे म्हणून ३ हजार ३०७ संशयित रुग्णांचे रक्तजल नमुने तपासणीला पाठवले आहेत. शहरात डेंग्यू आजाराचे २७ रुग्ण आढळून आलेले आहेत. या रुग्णांपैकी १५ पुरुष व १२ महिला रुग्ण आहेत. सध्या पावसाळा सुरू असून हिवताप, डेंग्यू व चिकुनगुन्या यासारख्या कीटकजन्य आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने 'डेंग्युमुक्त पीसीएमसी' मोहिमेची सुरुवात केली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात हिवताप, डेंग्यू, चिकनगुन्या या आजारांच्या साथीचा प्रादुर्भाव वाढू नये, याकरिता पावसाळ्यात प्रत्येक नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. या मोहिमेतून 'ई' क्षेत्रीय कार्यक्षेत्रात शनिवारी (दि. २०) सकाळी ८ ते ९ या वेळेत अंकुशराव लांडगे, सभागृहाशेजारी जनजागृती करण्यात आली. महापालिकेच्या वतीने डेंग्युमुक्त पिंपरी-चिंचवड शहर अभियान राबवण्यात येत आहे. त्या अंतर्गत 'ई' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत कै. अंकुशराव लांडगे सभागृहाच्या आवारात या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.



### एक तास स्वत:साठी

» शहरात 'डेंग्युमुक्त पीसीएमसी' मोहिमेअंतर्गत सोमवार ते शनिवार महापालिकेमार्फत विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. तसेच दर रविवारी नागरिकांनी प्रत्येक आठवडा एक दिवस - एक तास या मोहिमेतून सकाळी ९ ते १० या वेळेत स्वत:करीता देण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांनी आपल्या घराच्या आतील, बाहेरील पूर्ण परिसराचे परीक्षण करावे. साचणारी सर्व ठिकाणे (डासोत्पत्ती स्थाने) नष्ट करावी. डेंग्यूस कारणीभूत असलेल्या आजारांच्या डासांची उत्पत्ती केवळ १० मिली. पाण्यामध्येसुध्दा होते याची कृपया नोंद घ्यावी. पावसाचे पाणी साठून डासांची उत्पत्ती होऊ नये, याकरिता काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिकेकडून केले आहे.

> डेंग्यूला आळा घालण्यासाठी महापालिकेच्या वतीने 'डेंग्युमुक्त पिंपरी-चिंचवड शहर अभियानात नागरिकांनी सहभागी व्हावे. आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. प्रत्येक आठवड्यात एक दिवस-एक तास आपले घर, परिसर स्वच्छ व कोरडे ठेवण्यासाठी प्रयत्न करावे.
>
> - विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका

> महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत 'बीट डेंग्यू' ही संकल्पना राबवली जात आहे. 'BE RESPONSIBLE, EDUCATE OURSELVES, ALERT PCMC, THROW AWAY STAGNANT WATER' अशी ही संकल्पना आहे. त्यानुसार नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, प्रत्येक आठवड्यात वेगवेगळ्या ठिकाणी मोहीम राबवणार आहे.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय दादेवर, उपायुक्त आयुक्त राजेश आगळे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, प्रशासन अधिकारी नाना मोरे, वैद्यकीय विभागातील अधिकारी, महापालिकेच्या शाळांचे विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपस्थित कलाकारांनी व कर्मचाऱ्यांनी पथनाट्याद्वारे डेंग्यूबाबत जनजागृती केली. यावेळी डेंग्यूबाबत जनजागृती करण्यासाठी परिसरात जनजागृती रॅली काढण्यात आली होती. यामध्ये अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नागरिकांनी आपल्या घरात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच आपला परिसर स्वच्छ ठेवावा, डेंग्यूची लक्षणे आढळल्यास तातडीने उपचार घ्यावेत, असेही आवाहन महापालिकेकडून केले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या मेट्रोच्या नावाखाली बेकायदा वसुली!

## कासारवाडीत पुलाखालील पार्किंग वसुलीने वाहनचालक वैतागले, इतरत्र वाहने लावल्यास बसतो भुर्दंड

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या पे अँड पार्क पॉलिसी गुंडाळली आहे. तसेच, महामेट्रोच्या ताब्यात असलेल्या पार्किंगवरही अद्याप ती कार्यान्वित झालेली नाही. मात्र, कासारवाडी, नाशिक फाटा येथील उड्डाण पुलाखाली पार्क केलेल्या वाहनचालकांकडून मेट्रो पार्किंग नावाखाली पैसे वसूल केले जात आहेत. विशेष म्हणजे संबंधित व्यक्ती मेट्रोचे पार्किंग असल्याचे सांगत असून, वाहनचालकांना अडवणूक करत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

पीसीएमसी ते सिव्हिल कोर्ट ( पुणे) या दरम्यान मेट्रोला मोठ्या प्रमाणात प्रवासी मिळालेले आहेत. त्यापटीत महसूल देखील प्राप्त होत आहे. मात्र, प्रवाशांना पायाभूत सुविधा देण्यास मेट्रोला अपयश येत आहे. महत्त्वाचे म्हणजे मेट्रो सुरू होण्यापूर्वी पार्किंग व्यवस्था करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे नाईलाजाने वाहनचालकांना पदपथ, रस्ता, उड्डाणपुलाखालील मोकळी जागा, प्रमुख चौकात पार्किंग केले जाते. त्यामुळे चौकात बकालपणा आणि वाहतूक कोंडीची समस्या उद्भवू लागली आहे. विशेष म्हणजे महापालिका आणि मेट्रो यांना प्रवासी कोठे वाहन पार्क करतात, त्याचे काहीही सोयरसुतक नाही. त्यामुळे मेट्रो चालू होऊन वर्ष झाले तरी पार्किंगची व्यवस्था करता आलेली नाही.



### जनसंपर्क विभाग नावाला

» महामेट्रोकडून प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळतील, असे आश्वासन वेळोवेळी देण्यात येते. मात्र, जनसंपर्क विभाग अतिशय ढिसाळ असल्याचे दिसून आले. महामट्रोचे कार्यकारी संचालक तथा हेमंत सोनवणे यांच्याशी संपर्क होऊ शकत नाही. दुसरीकडे मेट्रोने स्थापन केलेला जनसंपर्क विभागही नावापुरता संपर्क करतो. प्रवाशांच्या तक्रारी, समस्यांशी त्यांना काहीही देणे-घेणे नसल्याचे दिसून आले.

### रस्त्यावर वाहने लावल्यास दंडाची नोटीस

» वाहनचालक मेट्रोने प्रवास करून कोणती शिक्षा करतात का, असा सवाल प्रवाशांना पडला आहे. कारण, रस्त्यावरती वाहन पार्क केल्यानंतर अनेक वाहनचालकांना हजारो रुपयांच्या दंडाची नोटीस प्राप्त झाली आहे. त्यातच तिकीट तीस रुपयांचे मात्र, दंड हजाराचा, यामुळे प्रवाशांना नाहक भुर्दंड पडत आहे. दुसरीकडे या दंडापासून वाचण्यासाठी कोपऱ्यात पार्क केलेल्या वाहनचालकांकडून अशाप्रकारे सक्तीची वसुली सुरू आहे. यामुळे वाहनचालक वैतागले आहेत.

# फळे-भाजीपाला विभागातही आता अतिरिक्त जागाभाडे

## संचालक मंडळ बैठकीत सचिव ठेवणार प्रस्ताव; सर्व विभागांना समान न्यायाचे तत्त्व

**पुणे | प्रतिनिधी**

मार्केट यार्डातील फुल बाजाराच्या धर्तीवर आता फळे-भाजीपाला, कांदा, बटाटा विभागात आडत्यांकडून वापरण्यात येणाऱ्या जागेसाठी अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. गाळ्यासमोर वापरण्यात येणाऱ्या १५ फूट आणि इतर ठिकाणी माल ठेवल्यास त्यापोटी हे शुल्क आकारण्यात येणार आहे, त्यामुळे बाजार समितीचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

फुल बाजारात मागील अनेक वर्षांपासून जागा वापरासाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाते. करोना महामारीच्या काळात सुमारे दीड वर्ष हे शुल्क बंद करण्यात आले होते. त्यानंतर संचालक मंडळ निवडून आले आहे, त्यांनी फुल बाजारात पुन्हा अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव दिला आहे.

मार्केट यार्डातील फुल बाजाराच्या धर्तीवर आता फळे-भाजीपाला, कांदा, बटाटा विभागात आडत्यांकडून वापरण्यात येणाऱ्या जागेसाठी अतिरिक्त शुल्क आकारण्यात येणार आहे. फुल बाजारातील व्यापाऱ्यांनी याला विरोध केला आहे. शेजारी असलेल्या विभागात अतिरिक्त जागा भाडे नाही. मग, आमच्याकडूनच का, अशी भूमिका व्यापाऱ्यांनी घेतली आहे. मार्केट यार्डात फळे-भाजीपाला विभागात डमी आडत्यांची संख्या मोठी आहे. अनेक वर्ष प्रयत्न करूनही डमींची संख्या कमी झालेली नाही. कारवाई केल्यास तेवढ्या पुरते डमींची संख्या कमी होते. त्यानंतर मात्र, पुन्हा डमी वाढतात फुल बाजारातील आडत्यांकडूनही जागेचा शुल्क आकारू नये, अशी विनंती अखिल पुणे फुलबाजार आडते असोसिएशनने निवेदनातून बाजार समिती प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर सर्व बाजूचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे समजते.



### ते पैसे जातात तर कुठे...

» फुल बाजारातील आडत्यांकडून आकारण्यात येणारे शुल्क रोख स्वरूपात स्विकारले जाते. धनादेश अथवा इतर ऑनलान पद्धतीने हे पैसे घेण्यात येत नाहीत. या पैशाची पावतीही देण्यात येत नाही. त्यामुळे हे पैसे जातात तर कुठे असा प्रश्न निर्माण होतो. हे पैसे बाजार समितीतच भरले जातात. तांत्रिक कारणामुळे पावत्या देणे शक्य नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे, तरीही पैशाबाबत शंकेस वाव आहे.

### डमी रोखण्यासाठीचा मास्टर प्लॅन...

» मार्केट यार्डात फळे-भाजीपाला विभागात डमी आडत्यांची संख्या मोठी आहे. अनेक वर्ष प्रयत्न करूनही डमींची संख्या कमी झालेली नाही. कारवाई केल्यास तेवढ्या पुरते डमींची संख्या कमी होते. त्यानंतर मात्र, पुन्हा डमी वाढतात. या पार्श्वभूमीवर जागेवर अतिरिक्त शुल्क आकारल्यास डमीची संख्या कमी होण्यास मदत होईल. दुसरीकडे बाजार समितीचे उत्पन्नही वाढेल.

> "मार्केट यार्डात जर फुल बाजारात जागेसाठी ज्यादा शुल्क आकारण्यात येत आहे. तर तोच नियम फळे, भाजीपाला, कांदा, बटाटा विभागाला लावला जाईल. जागेसाठी ज्यादा शुल्क आकारण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठेवण्यात येणार आहे."
>
> **- डॉ. राजाराम धोंडकर, सचिव, पुणे बाजार समिती**

> "मार्केट यार्डात शेजारी असलेल्या फळ-भाजीपालासह विविध विभागात अतिरिक्त जागा भाडे आकारण्यात येत नाही. मात्र, फुल विभागातच का घेण्यात येते. एका विभागाला वेगळा न्याय, दुसऱ्या विभागाला वेगळा न्याय का, फुल विभागात ज्यादा शुल्क आकारण्यात येऊ नये."
>
> **- अरूण वीर, अध्यक्ष, अखिल पुणे फुलबाजार आडते असोसिएशन**

# खेड तालुक्याच्या पश्चिम पट्यातील कळमोडी धरण शंभर टक्के भरले

## पावसाचा जोर वाढल्यास विसर्ग वेगाने होणार असल्याने नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्याच्या पश्चिम पट्यातील आरळा नदीवरील कळमोडी धरण शंभर टक्के भरले असून, सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग आरळा नदीपात्रात होण्यास सुरुवात झाली आहे. मागील वर्षी धरण १७ जुलै रोजी शंभर टक्के भरले होते. मात्र चालू वर्षी धरण चार दिवस उशिरा म्हणजे रविवारी (ता. २१) पहाटे साडेपाच वाजता भरले. धरण पूर्ण क्षमतेने भरताच धरणाच्या सांडव्यावरून ३२ क्यूसेक वेगाने पाणी आरळा नदीपात्रात विसर्ग होत आहे.

चास कमान धरणाच्या पाण्यापासून वंचित राहिलेल्या खेड तालुक्यातील गावांसह आंबेगाव तालुक्याच्या सातगांव पठार भागास वरदान ठरणारे हे धरण आहे. कळमोडी धरण परिसरात पावसाचा जोर गेली काही दिवसांपासून कमी जास्त होत होता. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील गाव व परिसरात पावसाचा जोर बऱ्यापैकी राहिल्याने धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होऊन धरण शंभर टक्के भरले. पावसाचा जोर वाढल्यास विसर्ग वेगाने होणार असल्याने नदीकाठच्या गावांना सावधानतेचा इशारा देण्यात आला असल्याची माहिती धरण प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

धरण पातळीवर सहाय्यक अभियंता श्रेणी १ ए. के. पवार, सहाय्यक अभियंता एस. एस. सुसुंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी रोहिदास नाईकडे, संभाजी बोंबले, शांताराम सातपुते चोवीस तास लक्ष ठेवून आहेत. धरणात १.५१ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. मागील वर्षी धरण भरण्यासाठी १७ जुलै हा दिवस उजाडला होता.



### धरण परिसरात 446 मिलिमीटर पावसाची नोंद

» धरण भरण्यास यंदा २१ जुलै हा दिवस उजाडला म्हणजे चार दिवस उशिरा कळमोडी धरण भरले. धरण परिसरात एक जूनपासून ४४६ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. कळमोडी धरण भरल्याने या धरणातून बाहेर पडणारे पाणी चास कमान धरणात येत असल्याने चास कमान धरणातील पाणीसाठा वेगाने वाढण्यास मदत होणार आहे.

> चिखलगांव, साकुर्डी देवोशी, कुडे, योणिये, बांगरवाडी या गावांना या धरणाच्या पाण्याचा प्रत्यक्ष फायदा होत असून पश्चिम भागातील अनेक गावाच्या पाणीपुरवठा योजना या कळमोडी प्रकल्पावर अवलंबून असल्याने पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुद्धा या निमित्ताने सुटला आहे. आमदार दिलीपराव मोहिते पाटील यांच्या माध्यमातून नुकतीच धरणाची उंची वाढवण्यासाठी निधी उपलब्ध झाल्याचे सांगण्यात आले असून त्यामुळे उन्हाळ्यात होणारी पाणीटंचाई दूर होऊन सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे.
>
> **- बाळासाहेब गोपाळे, अध्यक्ष, कळमोडी प्रकल्प संघ समिती, माजी सरपंच**